अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

खास सभा
नोटीस

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची ड चे प्रकरण -२ नियम क्र. १ (ह) अन्वये )

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
दिनांक - ९-६-२००५

श्री. / श्रीमती - - - - - - - - - - - - - -
सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका.

यांस-

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची ड चे प्रकरण २ नियम क्र. १ (ह) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची खास सभा सोमवार दिनांक २०-६-२००५ रोजी दुपारी १.०० वा. महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्याची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत - विषय पत्रिका व टिप्पणी .

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

सोमवार दिनांक २०-६-२००५ रोजी दुपारी १.०० वाजता महानगरपालिका सभागृहात होणा-या खास सभेपुढील विषय पत्रिका.

१) मा.शासनाचे जकात कर लागू करणे बाबतचे दिनांक ३१ मार्च २००५ चे पत्रानुसार जकात कर लागू करणे बाबत विचार विनीमय करणे, जकात लागू करावयाची झाल्यास जकात वसुली साठीच्या प्रक्रिये बाबत धोरण ठरविणे तसेच जकात नियमाच्या मसुदयास मान्यता देणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.
२) अहमदनगर शहर एकात्मिक रस्ते विकास योजना राबविणे बाबत मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळ, मुंबई यांचेकडील पत्र व त्यावरील ऑफिस रिपोर्ट
३) मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज.

मा.महापौर यांचे मान्यतेने
दिनांक - ९-६-२००५
अहमदनगर.

नगर सचिव
अहमदनगर महानगरपालिका.

- - - - -

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

सोमवार दिनांक २०-६-२००५ रोजी दुपारी १.०० वा. महानगरपालिका सभागृहात होणा-या खास सभेपुढील विषया बाबतची टिप्पणी.

| अ.नं. | विषय क्रमांक | टिप्पणी |
|---|---|---|
| १ | १ | ऑफिस रिपोटार्नुसार मंजूरीस शिफारस आहे. |
| २ | २ | ऑफिस रिपोटार्नुसार मंजूरीस शिफारस आहे. |
| ३ | ३ | टिप्पणी नाही. |

दिनांक - ९-६-२००५
अहमदनगर.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

प्रस्ताव क्रमांक : १ (अ ) दि.१६ - ७ - २००५

प्रस्तावाचा विषय - १ ( अ ) मा.शासनाचे जकात कर लागु करणे बाबतचे दि.३१ मार्च २००५ चे पत्रानुसार जकात कर लागु करणे बाबत विचार विनिमय करणे, जकात लागु करावयाची झाल्यास जकात वसुली साठीच्या प्रक्रिये बाबत धोरण ठरविणे तसेच जकात नियमाच्या मसुद्यास मान्यता देणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

प्रस्तावाचा मजकूर - मे.शासनाचे दिनांक २४-४-९९ चे फॅक्स आदेशानुसार दिनांक १-५-९९ पासून तत्कालीन नगरपरिषदेकडून वसुल करण्यात येत असलेला जकात कर रद्द करण्यात आला त्यांनतर दरम्यानचे काळात महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडील अधिसुचना क्रमांक जीईएन १०२०००/१९०/प्र.क्र.९ नवि-२४ दिनांक ३० जून २००३ अन्वये अहमदनगर शहर महानगरपालिका अस्तित्वात आली.

महानगरपालिका हद्दीत मुलभुत सोयी उपलब्ध करुन देणे व महानगरपालिकेचा दैनंदिन कारभार चालविणेकामी मोठया प्रमाणात निधीची आवश्यकता आहे. व असा निधी कराच्या माध्यमातुन उभा करावा लागेल. “ जकात कर ” हा स्थानिक स्वराज्य संस्थेचा महत्वाचा आर्थिक कणा आहे व त्यापासून महानगरपालिकेस दैनंदिन आर्थिक उत्पन्न मिळेल. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२७ (२) नुसार महानगरपालिका क्षेत्रात जकात कर बसविता येईल अगर उक्त अधिनियमाच्या कलम १५२ अ नुसार मे.राज्य शासनाचे पुर्व परवानगी नुसार जकाती ऐवजी उपकर बसविता येईल.

यास्तव महानगरपालिका प्रशासक ठराव नं.४० दिनांक १६-९-२००३ अन्वये शहर महानगरपालिका क्षेत्रात जकात कराची अंमलबजावणी व वसुली करणे बाबतचा ठराव संमत करुन मा.सचिव, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय,मुंबई यांचेकडेस साप्रवि जा.क्र.८६३ दिनांक १८-९-२००३ अन्वये प्रस्ताव पाठविण्यात आला.

यावर मा.कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक एमएमसी - १००३-२४६०-प्रक्र -२८०-नवि - २४ दिनांक २८-११-२००३ अन्वये कळविले आहे की, “ महानगरपालिकेची महासभा अस्तित्वात येणार असून जकात कराबाबतचा प्रस्ताव मा.आयुक्तांनी महासभेसमोर ठेवावा व त्यावर निर्णय महासभेने घ्यावा व तद्‌नंतर याबाबत शासनाच्या मान्यतेची आवश्यकता भासल्यास तसा प्रस्ताव शासनास सादर करावा .”

मे.महाराष्ट्र शासनाचे वरील पत्रानुसार, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२७(२) नुसार अहमदनगर शहर महानगरपालिका हद्दीत जकात कराची अंमलबजावणी करण्यास मंजूरी मिळणे बाबतचा सविस्तर प्रस्ताव दि.२०-२-२००४ रोजीचे महानगरपालिका सभे समोर ठेवला यावर महानगरपालिका ठराव क्र.१५ दि.२०-२-२००४ अन्वये खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

ठराव :“ महाराष्ट्र शासनाकडून जोपर्यंत जकाती पोटी अनुदान मिळणार आहे तो पर्यंत जकात कर लावू नये ज्यावेळी महाराष्ट्र शासनाकडून जकातीपोटी येणारे अनुदान बंद होईल त्यानंतर जकात कर लावण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात यावा.” सदर ठराव मा.उपसचिव,महाराष्ट्र शासन यांनी शासन निर्णय क्र.एचएमसी १००४/२४६ प्रक्र.२०८/०४ /नवि-२४ दि.९ ऑगस्ट २००४ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५१ मधील तरतुदीस अधिन राहून विखंडीत केला.

दरम्यानचे काळात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांनी शासन निर्णय क्र. २५०३ /१५९४ प्रक्र ५९ /०४/ नवि-२६ दि.२० एप्रिल २००४ व १ जून २००४ अन्वये कळविण्यात

आले की, " अहमदनगर महानगरपालिका अस्तित्वात आलेली महानगरपालिकेचे संपूर्ण क्षेत्र " अ." वर्ग नगरपालिका गृहित धरुन जी अनुदाने अनुज्ञेय होतात ती अनुदाने अहमदनगर महानगरपालिकेस दि.३० जून २००३ पासून दोन वर्षाचे कालावधीसाठी अनुज्ञेय होतील. "

मे.शासनाचे वरील निर्णयानुसार महानगरपालिकेस जकातीपोटी मिळणारे अनुदान हे ३० जून २००५ पर्यंत मिळणार आहे. दि.१ जुलै २००५ पासून जकातीपोटी मिळणारे अनुदान बंद होणार आहे. त्यामुळे महानगरपालिकेची आर्थिक स्थिती सुधारण्याकरिता जकात कर लावणे आवश्यक आहे.सबब मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२७ (२) अ नुसार अहमदनगर शहर महानगरपालिका हद्दीत जकात कराची अंमलबजावणी करण्यास मंजूरी मिळावी.

यावर प्रभारी मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, ''महानगरपालिकेची आर्थिक स्थिती विचारात घेता महानगरपालिकेची आर्थिक स्थिती मजबुत करणे व सुधारणे ही अत्यावश्यक बाब आहे. यापूर्वी तत्कालीन नगरपरिषदेच्या कालावधीत वेळोवेळी पूर्ण झालेले लेखापरिक्षण व वार्षीक तपासणी अहवाल यामधे उत्पन्नाचे स्त्रोत वाढविणेबाबत मार्गदर्शनपर सुचना करण्यात आलेल्या आहेत. अन्यथा महानगरपालिकेला आर्थिक टंचाईस सामोरे जावे लागेल. आजही शासकीय देणी पाहता व विकासाची कामे करणे अत्यावश्यक असलेमुळे उत्पन्न वाढीचे मार्ग पाहता मा.शासनाच्या आदेशानुसार जकात सुरु करणे संयुक्तिक आहे. तथापी आपले स्तरावर निर्णय घेणे योग्य.''

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, ''मुख्य लेखापरिक्षक यांचे अहवालात महानगरपालिकेचे उत्पन्न वाढीबाबत उपाययोजनांबाबत निकड नमूद करण्यात आलेली आहे. जकात कर लागू करणेबाबत जरी प्रशासकीय ठराव क्र.४० दि.१६-९-२००३ अन्वये प्रस्ताव पाठविण्यात आला होता. तरी तो शासनाकडून मान्य करण्यात आलेला नाही. प्राप्त होणा-या अनुदानाचा विचार करुन महानगरपालिकेनेही ठराव क्र.१५ दि.२०-२-२००४ अन्वये जकात कर लागू करणे टाळलेले आहे.

आगामी आर्थिक वर्ष २००५-०६ मध्ये केवळ पहिल्या ३ महिन्यामध्ये जकाती ऐवजीचे १००% अनुदान प्राप्त होईल. तद्नंतर टप्प्याटप्प्याने ते कमी केले जाईल. सद्य परिस्थितीत दरमहा रु.१.५२ कोटी इतके मासिक अनुदान प्राप्त होत असून ही रक्कम ६६% म्हणजेच रु.१.०० कोटी होवून रु.०.५२ कोटी इतकी मासिक तूट भासणार आहे. पुढील वर्षात (२००५-०६) एकूण ९ महिन्यात ही तूट रु.४.५० कोटी इतकी होणार असल्याने त्यास उत्पन्न वाढीचा पर्याय अत्यावश्यक आहे. याशिवाय महानगरपालिकेस महागाई भत्ता अनुदान अंदाजे मासिक रु.५८ लक्ष प्राप्त होत असून त्यामध्येही ३३% कपात होईल. महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाचे नियंत्रणाखाली काम करणा-या कर्मचारी वर्गावर सध्या २०% खर्च महानगरपालिका करते. हाही वाटा ५०% होणार आहे. पर्यायी उत्पन्नाचे स्त्रोत विकसित न केल्यास महानगरपालिकेस भविष्यातील आर्थिक भार सोसणे अशक्य आहे. वरीलप्रमाणे परिगणती करताना १०% वाढ विचारात घेतलेली नाही. ती जर विचारात घेतली तर तुट आणखी वाढणार आहे.

वरील बाबींचा विचार करुन दि.१ जुलै २००५ पासून अहमदनगर शहरात जकात कर लागू करणेसाठी विषय सर्वसाधारण सभेपुढे घेण्यासाठी शिफारस आहे. तसेच याप्रमाणे आगामी अर्थसंकल्पात तरतूद करणे उचित वाटते. ''

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, ''जकात कराचे जुने मंजूर दरासह फेरसादर करा. सदरचे दर केव्हापासून अंमलात आहेत? सर्व आयटेम किंमतीवर आकारले आहेत का?''

यावर फेर सादर की, ''यासोबत जकात कराचे जुने मंजूर दरपत्रक (तत्कालीन नगरपालिका) व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे शासन मान्यताप्राप्त कमाल व किमान दरपत्रक यासोबत जोडलेले आहे.

तत्कालीन नगरपरिषदेचे दर दिनांक १-९-९३ पासून अंमलात आलेले होते.त्यामध्ये सर्व (आयटेम) किंमतीवर आकारण्यात आलेली नव्हती. काही वस्तूची जकात वजनावरसुध्दा आकारण्यात येत होती.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका धर्तीवर तयार करण्यात आलेले जकात नियम, स्थायी आदेश व जकात दर अनुसूची सोबत जोडली आहे. त्याप्रमाणे जकात नियम स्थायी आदेश व जकात दर अनुसूची मधील स्तंभ (५) नुसार जकात कर लावणेस मान्यता मिळावी, ही विनंती.

तसेच जकात कर,मनपाचे वाढीव क्षेत्र,लोकसंख्या वाढ लक्षात घेता व सदर जकात वसुली ठेकयाने दयावयाची झाल्यास ही बाब विचारात घेता सन २००५-२००६ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकात ९ महिन्याकरीता (दिनांक १-७-२००५ ते ३१-३-२००६) जकातीपोटी रुपये २४,८३,७२,४८१/- (अक्षरी रुपये चोवीस कोटी त्र्याऐंशी लाख बहात्तर हजार चारशे एक्क्याऐंशी मात्र) तरतूद करणे आवश्यक आहे.''

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, ''वरील अहवालानुसार दिनांक १-७-२००५ पासून जकात कर लागू करणेसाठी व सन १९९९ मध्ये जकात बंद झाली त्यावेळची जकात दरसुची महानगरपालिकेचे जकात नियम व स्थायी आदेश लागू होईपर्यंत आमलात ठेवणेबाबत निर्णय घेणेसाठी मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यास शिफारस आहे. तसेच आगामी अंर्थसंकल्पात त्याप्रमाणे तरतूद वरील अहवालात नमूद केल्याप्रमाणे करणेसाठी शिफारस आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जकात नियम व स्थायी आदेशाच्या धर्तीवर अहमदनगर महानगरपालिकेचे प्रारुप नियम व स्थायी आदेशांचा मसुदाही सोबत सादर केला आहे. मसुदा तयार करताना दि. ३० एप्रिल १९९९ रोजी तात्कालीन नगरपरिषदेचे अस्तित्वातील/लागू जकात दर ही विचारात घेण्यात आले असून त्याप्रमाणे किमान दर लावण्यात आलेले आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम १४९ व १२७ (२) (१) अन्वये जकात कर लागु करणेबाबत महानगरपालिकेस निर्णय घेणे अवश्यक आहे. मात्र याबाबत कलम ४६६ नुसार उक्त निर्णयानंतर मा.आयुक्तांचे स्थायी आदेशान्वये जकात वसुलीची कार्यवाही नियम मंजूर होईपर्यंत करता येईल.तसेच सोबत सादर केलेल्या नियमांच्या मसुदयास महानगरपालिकेची मान्यता प्राप्त झाल्यानंतर कलम ४५४, ४५५ व ४५७ अन्वये कार्यवाही अवश्यक आहे.

वरील सर्व बाबीचा विचार करुन खालील बाबींना सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी प्रस्ताव ठेवणे उचित राहील.

१) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२७ (२) (१) नुसार दि.१ जुलै २००५ पासून अहमदनगर म.न.पा.हद्दीत जकात कर लागू करणे.

२) नियम मंजूर होईपर्यंत दिनांक ३० एप्रिल १९९९ रोजी अस्तित्वातील जकात दर स्विकारणे.

३) नियमांच्या मसुदयास कलम १४९ नुसार मंजूरी देवून कलम ४५४, ४५५ व ४५७ नुसार कार्यवाहीसाठी मा.शासनाकडे मंजुरीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी पाठवणे.

४) आगामी सन २००५-०६ चे अर्थसंकल्पात जकात करापासूनचे उत्पन्न म्हणून रु.२४,८३,७२,४८१/- इतकी तरतूद करणे.

तरी वरीलप्रमाणे प्रस्ताव महासभेपुढे ठेवणेसाठी शिफारस आहे.''

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, ''उपरोक्त कार्यालयीन प्रस्तावाचे अवलोकन करणेत यावे. अ.नगर मनपा हद्दीत शासनाचे जकात अनुदानात जुलै ०५ पासून ३३% कपात होणार असल्याने, तसेच सदरचे अनुदान हे तत्कालीन न.प.चे जकातीचे उत्पन्नावर आधारीत आहे, त्यामुळे मनपाचे आर्थिक, महसूली उत्पन्नाची बाब म्हणून प्रस्तावित केलेप्रमाणे जकात लागू करणे अत्यावश्यक आहे.''

यावर फेरसादर की, जकात सुरु करणेबाबतचा प्रस्ताव दि.७-२-०५ रोजी झालेल्या मा.स्थायी समितीपुढे ठेवला असता त्यावर मा.स्थायी समितीने जकात व जकात दर नियम लागू करणेबाबत कोणताही निर्णय न घेता सदरचा प्रस्ताव महासभेपुढे पाठविला.

दि.१९-२-०५ रोजी झालेल्या मा.महासभेपुढे मा.स्थायी समितीकडून आलेला जकातचा प्रस्ताव ठेवला असता त्यावर मा.महासभेने ठराव क्र.१ (अ) दि.१९-२-०५ अन्वये पुढील प्रमाणे निर्णय घेतला - '' दिनांक १ जुलै २००५ रोजी जकात कर अनुदान कपात होणार आहे. अनुदानातील ३३% कपात विचारात घेवून जकात कर लावणे अन्यायकारक ठरेल असे मा.सभागृहाचे मत आहे. त्यामुळे आगामी वर्षाकरिता जकात कर लागू करणे ही बाब अमान्य करणेत येत आहे. '' त्यामुळे चालू आर्थिक वर्षात जकात लावणेची कार्यवाही करता येणे शक्य नव्हते.

त्यानंतर मा.महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.जीईएन १००५/ उपकर/नवि-२४ दि.३ मार्च २००५ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात प्रवेश उपकर पध्दती लागू करणेबाबतची कार्यवाही तात्काळ सुरु करावी, असे आदेशीत करणेत आले.

सदर उपकर अहमदनगर महानगरपालिका हद्दीत सुरु करणेबाबत आवश्यक ती माहिती घेण्यासाठी महानगरपालिकेचे उपायुक्त व इतर अधिकारी हे नवी मुंबई येथे जाऊन माहिती घेऊन आलेले आहेत. सदर पध्दती समजावून घेणेसाठी व अवलंबिण्यासाठी असणारा कालावधी फारच अल्प आहे. त्यामुळे जुलै २००५ पासून उपकर लावणे अशक्य आहे.

जळगांव महानगरपालिकेच्या स्थापनेस दि.३१ मार्च २००५ अखेर २ वर्षे पूर्ण झाली असल्याकारणाने जळगांव महानगरपालिका आयुक्त यांना उपसचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांनी पत्र क्र.जीईएन-१००५/उपकर/प्र.क्र.१०३/नवि-२४ दि.३१ मार्च ०५ अन्वये खालीलप्रमाणे सुचीत केलेले आहे.

'' विषय -महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रवेश उपकर पध्दती लागू करणेबाबत.

आपल्या महानगरपालिकेस दोन वर्षे पूर्ण होत असल्याने राज्य मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार यापुढे महानगरपालिकेस जकात अनुदान मिळणार नसल्याने आगामी आर्थिक वर्षापासून महानगरपालिका क्षेत्रात प्रवेश उपकर लागू करावा असे आपणास स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत.

०२. अशा परिस्थिती महानगरपालिकेने विकास कामे व दैनंदिन खर्च भागविणेसाठी उत्पनाचे स्त्रोत बळकट करणे आवश्यक आहे. यास्तव मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार महानगरपालिकेने आगामी आर्थिक वर्षापासून जकात लागू करणे आवश्यक आहे.

०३. जकात नियम तयार करुन ते लागू करण्याच्या प्रक्रियेस दिर्घ काळ लागतो हे लक्षात घेता महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अंतर्गत तयार केलेले जकात नियम १९६९ नुसार जकात दरसूचीप्रमाणे जकात दर आगामी आर्थिक वर्षापासून अविलंब लागू करावेत व शासनास अनुपालन अहवाल पाठवावा. ''

वरील पत्र जळगांव महानगरपालिका आयुक्तांना देऊन सदर पत्राची प्रत धुळे व अहमदनगर महानगरपालिका आयुक्त यांना देऊन उपरोक्त सुचनानुसार कार्यवाही करणेसाठी अग्रेषीत केले आहे.

अहमदनगर महानगरपालिका जकात अनुदान ३० जून २००५ रोजी महानगरपालिकेच्या स्थापनेस २ वर्षे पूर्ण होत असलेने, बंद होणार आहे.त्यामुळे अहमदनगर महानगरपालिकेस उत्पन्नाचा स्त्रोत शोधणे गरजेचे आहे. उपकर पध्दती अवलंबिण्यास लागणारा उशीर व महानगरपालिकेचे शासनाकडून बंद होणारे अनुदान याचा विचार करता १ जुलै २००५ पासून अथवा तत्पूर्वी महानगरपालिकेस शहर हद्दीत जकात सुरु करणे आवश्यक वाटते. यासोबत जकात नियम व दरसूची जोडलेली आहे. त्या नियम व दरानुसार १ जुलै २००५ पासून जकात कार्यवाही करणेस मंजुरी दयावी, ही विनंती.

यावर मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, '' अहवालाप्रमाणे कार्यवाही करणेस शिफारस आहे.''

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, '' जकात / उपकर हे ऐच्छिक कर असल्यामुळे जकात / उपकर लागू करणेसाठी म.न.पा चा निर्णय अवश्यक आहे. म.न.पा.ने जकात लावणेबाबत दोन वेळा प्रस्ताव नाकारलेला आहे. मात्र दि.१९-२-०५ रोजी प्रस्ताव नाकारताना केवळ ३३ टक्के अनुदान बंद होणार असल्यामुळे तुर्त जकात लावणे टाळले आहे. वरील अहवालात नमूद पत्रात २ वर्षानंतर अनुदान बंद होणार आसल्याचा उल्लेख आसल्यामुळे सदरचे पत्र मा.महासभेच्या निदर्शनास आणून निर्णयासाठी सादर करणे उचित राहील. तसेच सन २००५-०६ च्या अंदाजपत्रकात अपेक्षिलेले जकात कर अनुदान रु.९.०० कोटीवरही वरील पत्रानुसार परिणाम होणार आसल्यामुळे त्यांचे अर्थसंकल्पीय अंदाज २००५-०६ वर परिणाम होतील हेही निदर्शनास आणावे लागेल. ''

'' शासनाकडून अनुदान बंद होणार असून या बाबीचा विचार करुन जळगांव मनपाने जकात सुरु केली असून धुळे मनपाने ही जकातीबद्दल निर्णय घेतला आहे. अहमदनगर मनपा सही याशिवाय पर्याय नसल्याने जकात सुरु करणेबाबत विचार होणे अवश्यक आहे. ''

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, '' कार्यालयीन टिपणी पान क्र.१५ ते १६ चे अवलोकन केले. शासन पत्र दि.३१ मार्च ०५ अन्वये मनपा क्षेत्रात प्रवेश उपकर तसेच जकात लागू करणेबाबत निर्देशित केले आहे. सदरचे पत्रात मनपास २ (दोन) वर्षे पूर्ण आलेनंतर जकात अनुदान मिळणार नसलेबाबत कळविले आहे. प्रवेश उपकर पध्दती अत्यंत क्लिस्ट असून असून त्यापासून उत्पन्न मिळविण्यात अनेक अडचणी आणि प्रश्न निर्माण होणार आहेत. सदरची पध्दती अमरावती मनपा ने सुरु केली होती. परंतु त्याची अंमलबजावणी सदोष आणि अपेक्षीत उत्पन्न न मिळाल्याने ती बंद करुन पुन्हा जकात सुरु केली आहे. त्यामुळे ''प्रवेश उपकर'' पध्दती लागू करणे संयुक्तीक वाटत नाही.

जळगांव ही नवीन मनपा असून त्यांनी २००५-०६ या नवीन आर्थीक वर्षात जकात सुरु केली आहे. शासनाचे निर्देश विचारात घेता मनपाचे दैनंदिन कामकाज, अत्यावश्यक सेवा सुविधा आणि विकास कामे करणेकामी स्वतःचे आर्थिक स्त्रोत - उत्पन्न वाढविणे / निर्माण करणे आवश्यक आहे. प्रस्तावित केलेप्रमाणे जकात कर लागू केलेशिवाय पर्याय नसल्याचे आढळते. याबाबत विशेष महासभा बोलावून निर्णय घेणे योग्य वाटते. ''
अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.खास सभेपुढे ठेविला.

सभेपुढील चर्चा

जकातीबाबत सभेपुढे प्रस्ताव मांडण्यात आल्यानंतर चर्चेला सुरुवात करण्यात आली.
१.मा.श्री.दिप चव्हाण,नगरसेवक - चर्चेत भाग घेतांना मागील दिनांक २०/७/२००५ ची या प्रस्तावाबाबत बोलाविण्यात आलेली सभा न्यायप्रविष्ठ असल्यामुळे तहकुब करण्यात आलेली होती.आता हा न्यायप्रविष्ठ प्रश्न चर्चेकरीता घेता येतो काय ? न्यायप्रविष्ठ असलेली सभा नियमीत आहे काय ?अशाबाबत मागणी केली. तहकूब सभेच्या न्यायप्रविष्ठ असलेल्या सभेबाबत असा निर्णय घेता येतो काय ? याबाबत जे कारण पुर्वीच्या सभेसाठी देण्यात आले होते.ते संपृष्टात आले आहे काय ?
२. मा.महापौर - यांनी सदरील प्रश्न न्यायप्रविष्ठ नाही.सभा फक्त तहकुब केलेली होती. यावर मा.श्री दिप चव्हाण यांनी सांगीतले की, न्यायालयाचा अवमान होत असेल तर ही कृती गंभीर बाब आहे.लोक पुन्हा न्यायालयात धाव घेतील.त्याकरीता ही न्यायप्रविष्ठ विषय नाही.असे जाहीर करावे.असे सुचविले.
३. मा.श्री एस व्ही.देशमुख ,उपायुक्त - यांनी खुलासा केला की, मागील दिनांक २०/६/२००५ ची सभा दिनांक १६/७/२००५ पर्यत तहकुब केलेली होती.कोर्टामध्ये असलेल्या याचिकेमध्ये व्यापारी यांनी शासन व महानगरपालिका यांना पार्टी केलेले आहे. कालही दिनांक १५-७-२००५ रोजी मे.हायकोर्टापुढे याबाबत सुनावणी झालेली आहे. यामध्ये मुद्दे उपस्थित करतांना अनुदाना बाबतचा प्रश्न पॉलिसी मॅटरचा आहे असे सांगितले. त्यामुळे याबाबत कोणत्याही प्रकारची स्थगिती / स्टे दिलेला नाही.

महानगरपालिकेला अनुदानातुन मिळणारी रक्कम कमी पडत असल्यामुळे याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे सादर केलेला आहे.
४. मा.श्री.भानुदास कोतकर - जकातीचा प्रश्न न्यायप्रविष्ठ प्रश्न आहे काय ? कोर्टामध्ये प्रश्न असल्यामुळे सभा कायदेशिर आहे काय? व आपण कोर्टामध्ये गेलो आहोत काय ? न्यायप्रविष्ठ प्रश्न असतांना सभेपुढे प्रश्न घेता येतो काय ? याची विचारणा केली. भाजप-शिवसेना युतीने जाहीर नाम्यामध्ये जकात लागु करणार नाही घरपटटी पाणी पटटी कमी करु असे आश्वासन दिले होते ते पाळले जात नसल्यामुळे कॉग्रेस व राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचा विरोध असल्याचे सांगितले.
जकात कर लावण्या ऐवजी मा.महापौरांनी २५ हजार टप-या उभ्या करण्यांचा प्रस्ताव दिलेला असल्यामुळे व त्यातुन भरीव उत्पन्न मिळणार असल्यामुळे जकात लावु नये. कारखानदारी अडचणीत येईल, बाजारपेठा बाहेर जातील, बेरोजगारी वाढेल.
५. मा.श्री.आसाराम कावरे - जकात लागु करण्यांत यावी असे मत मांडले व तसेच निवेदन वाचुन दाखविले. एम.आय.डी.सी कारखान्यांना जकातीमध्ये तीन ते पाच वर्ष सवलत द्यावी असे सुचविले.

६. मा.श्रीमती.शिंदे - कायनेटीक सारख्या कारखानदारीमुळे शहरात रोजगार मिळालेला आहे. त्यांच्यावर बरीचशी कुटुंबे अवलंबुन आहेत. कायनेटीकच्या नविन प्रॉडक्शनचे करार झालेले आहेत. त्यामुळे महानगरपालिकेस मोठया प्रमाणावर उत्पन्न मिळणार आहे. त्यांमुळे त्या कंपनीस जकातीत सवलत देण्याचा विचार करावा.

७. मा.श्री.दिपक सुळ - जकातीचा विषय दोन ते तीन वेळेस महानगरपालिका सभेपुढे चर्चेला आलेला आहे. या चर्चेतुन महानगरपालिकेला जकाती शिवाय पर्याय राहिलेला नाही असे दिसुन येते. महानगरपालिकेने जकात न लावता दोन वर्षे कारभार चालविलेला आहे. आता मात्र जकातीशिवाय पर्याय राहिलेला नाही. अहमदनगर महानगरपालिकेचे अनुदान बंद केलेले असल्यामुळे विविध विकास कामे, कर्मचारी यांची वेतने, निवृत्तीवेतने इत्यादी कशा प्रकारे भागवावी याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. व जकात चालु करण्यांबाबत शासनानेही महानगरपालिकेला पत्राव्दारे कळविले आहे. विविध कारखानदारांना जकात सवलती देण्याबरोबरच शहरामध्ये जकात कर लागु करण्यांत यावा व शासनाकडेस मंजूरीसाठी पाठवावा असे सुचविले.

८. मा.श्री.मनेष साठे,सभापती, स्थायी समिती - यांनी सांगितले भाजप-शिवसेनेने जरी जाहीरनाम्यामध्ये जकात चालु करणार नाही असे सांगितले असले तरी महानगरपालिकेची सध्याची आर्थिक परिस्थिती पाहता व महाराष्ट्र शासनाने १ जुलै २००५ पासुन जकात नुकसान भरपाई अनुदान बंद केलेले असल्यामुळे कर्मचा-यांचे वेतन कशा प्रकारे करावे हाही प्रश्न गंभीर स्वरुपाचा असल्यामुळे जकातीशिवाय पर्याय राहिलेला नाही. व मोठया प्रमाणावर उत्पन्न मिळविण्यांसाठी जकात कर लावण्यांत यावा. त्यास आम्ही पाठींबा देत आहोत.

९. मा.श्री.मिलींद गंधे - मा.स्थायी समितीचे सभापती यांनी आमच्या पक्षाची भुमिका विषद केली आहेच, महानगरपालिकेपुढे जकात किंवा उपकर असे पर्याय होते. तथापि उपकरासाठी तीन ते चार वर्षाचा कालावधी लागणार असल्यामुळे जकात कराचाच पर्याय पुढे आलेला आहे. त्यामुळे जकात कर लागु करणेच्या बाबीस भाजपा पाठींबा देत आहे.

१०. मा.श्री.उडाणशिवे - भाजप-शिवसेना युतीने जकात लावली जाणार नाही अशा बाबत आश्वासन दिले होते याची आठवण करुन दिली. त्यामुळे जकात कर लावु नये.

११. मा.श्री.अभय आगरकर - दि.२०-६-२००५ च्या सभेपुढे हा विषय आलेला असतांना सुध्दा ही सभा अकारण तहकुब करण्यांत आलेली होती. आम्हांस त्यावेळी आमची भुमिका मांडावयाची होती. तथापि त्यावेळेस आमचेकडे दुर्लक्ष करण्यांत आले. भाजप-शिवसेना मित्र पक्ष असल्यामुळे भाजप-शिवसेना युतीने निवडणुकीच्या जाहीरनाम्या मध्ये जकात न लावण्यांबाबतच भुमिका घेतलेली होती. व आत्ताही अशा परिस्थितीमध्ये व्यापारी यांचेशी विचारविनिमय करण्यांत येवुनच निर्णय घेवु असे सांगण्यांत आले आहे.

शासनाने महानगरपालिकेचे जकात अनुदान बंद करुन अडेलतटटुची भुमिका घेतलेली आहे. व अहमदनगर महानगरपालिकेस सापत्नतेची वागणुक देत असल्यामुळे अनुदान बंद करण्यांत आलेले आहे. धुळे महानगरपालिकेस तीन वर्षे १०० टक्के अनुदान दिलेले आहे मात्र अहमदनगर महानगरपालिकेस अनुदान दिलेले नाही. वास्तविक शासनाने अहमदनगर महानगरपालिकेसही अनुदान द्यावयास हवे होते. परंतु ते मिळालेले नाही. गेल्या दोन वर्षामध्ये सातत्याने उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करण्यांत आलेले आहेत. परंतु जकाती शिवाय पर्याय नसल्याने जकात कर लागु करण्याच्या भुमिकेपर्यत आम्ही पोहोचलो आहोत. आता जकात लागु करण्यांशिवाय पर्याय नाही हे दिसुन आले आहे. शहरात जकात लावल्यामुळे शहरातील भौगोलिक

परिस्थीती, औद्योगिक विकार, बाजारपेठा, बेरोजगारी, याचा विचार करीत असतांना कारखान्यांनाही सेटबॅक बसु शकतो, याबाबत जकात लावतांनाच विचार केला पाहिजे असे सांगितले कायनेटीक सारखी कंपनीमध्ये उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न चालू आहे.विदेशी करार होत आहे.या कंपनीवर इतर बरेचश्या उपकंपन्या अवलंबून आहे.तेव्हा जकात दर ठरवितांना व्यापारी औद्योगिक संस्था यांना दिलासा दिला पाहीजे.व त्यांच्या येणा-या हरकतीवर विचार केला पाहीजे.असे सुचविले.व त्यांनतर जकात कर लागू करण्यात यावेत असे सुचविले.

१२. मा.श्री .कैलास गिरवले, - तहकूब केलेली सभा आता पुन्हा बोलावून त्याच विषयावर चर्चा करण्यात येणार आहे. महानगरपालिका स्थापन झाली असल्यामुळे विकास कामे करणे आवश्यक असल्याने तसेच २५०० कर्मचारी यांचाही वेतनाबाबतचा प्रश्न निर्माण झालेला असल्यामुळे जकातीशिवाय पर्याय नाही.

१३. मा.श्री.अभय आगरकर - जकातीचा विचार करतांना प्रसिध्दीकरण करुन हरकती मागविल्या जाणार आहेतच त्यामुळे ऑफीस रिपोर्टामधील प्रस्ताव मंजूर करावा.अशी विनंती करतो.असे सांगीतले.

१४. मा.श्री दिप चव्हाण - मा.आमदार आजही जकात कर लावण्याच्या विचारात नाहीत.१ जुलै २००५ पासून आपण जकात लागू करणार होतो.आता एक ऑगस्टपासून जकात लागू करण्यात यावी.असे सांगीतले.

१५.मा.श्री.एस.व्ही.देशमुख,उपायुक्त - यांनी खुलासा केला की,जकात कर लावण्यास मा.शासनाच्या मंजूरीची आवश्यकता आहे.शासनाने मंजूरी दिल्यानंतर जकात तात्काळ लागू करु.

१६. मा.श्री दिप चव्हाण - नियम करावयाचे आहेत असे सांगीतले आहेत.तथापी ऑफीस रिपोर्टामध्ये तरतूद नव्हती.त्यामुळे एक जुलै पासून जकात लागू होत नाही याचा खुलासा करावा.नियम तयार करणेबाबत मा.शासनाने पत्र दिलेले आहेत.अशाबाबतचे पत्र सभागृहापुढे ठेवले आहे काय ?

१७. मा.श्री.एस.व्ही.देशमुख,उपायुक्त - यांनी खुलासा केला की, सविस्तर नियम बजेट सभेच्या वेळेस ठेवण्यात आलेले होते.त्यामुळे हा मुददा गैरलागू होतो.१ जुलै २००५ पासून जकात लागू करण्याचा प्रस्ताव आहे.व कलम १२७ (२) नुसार ठरविलेले आहे.

१८. . मा.श्री दिप चव्हाण - १ जूलै २००५ पासून जकात कर लागू न केल्याबाबतची जबाबदारी कोणावर आहे.ते निश्चित करावे.

१९. मा.श्री द.प.मेतके,आयुक्त - तत्कालीन नगरपरिषदेचे जे नियम होते ते लागू करावेत.असे म्हटले होते.तथापी नगरपरिषदेचे नियम लागू होणार नाही.अहमदनगर महानगरपालिकेच्या दरसुचीस मा.शासनाची मंजूरी घ्यावी लागणार आहे.

२०. मा.श्री दिप चव्हाण - महानगरपालिकेच्या नगरसेवकांची एकूण जबाबदारी काय आहे याबाबतचा तांत्रिक मुददा उपस्थित करीत असतांना आता सर्वाचीच मानसीकता झाली असल्याने जकात लागू करावी असे सांगीतले.महानगरपालिकेने मा.न्यायालयात ॲफडेव्हीड केलेले आहे.त्यात अनुदानाची मागणी केलेली नाही.शासनाला आपण शासनाला अनुदान मागत नाही.हा ठराव मा.शासनाने मंजूर केला नाही तर जबाबदारी कोणावर आहे.ती निश्चित करणे.

२१. मा.श्री भगवानराव फुलसौंदर ,महापौर - महानगरपालिकेची आर्थिक स्थितीचा संभाव्य धोका लक्षात घेवून जकात लावण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.व्यापारी यांच्या भावना लक्षात घेता व बाजारपेठ व बेरोजगारी याबाबत अडचणी लक्षात घेता त्यावर विचार करुन जकातीचा विषय मंजूर केलेला आहे.कारखानदारीबाबत योग्य तो विचार करु.

--**--

**ठराव :** जकात कर याच वर्षात सुरू करणे बाबत प्रशासनाने पाठपुरावा केला आहे. प्रशासनाने कलम १०४ प्रमाणेही प्रस्ताव स्थायी समितीला दिला आहे. कलम १०४ व १५०अन्वये चालू वर्षाच्या उर्वरित कालावधीत कर लावण्यांस महानगरपालिका सक्षम असल्याने सत्वर जकात लावण्यांस मंजूरी देणेंत येत आहे. त्याचप्रमाणे नियमांच्या मसुदयासही व स्थायी आदेशासह आवश्यक तरतुदीसह आवश्यक सुधारणांसह मंजुरी देण्यांत येत आहे.
आयुक्तांनी कायदेशिर बाबींची पुर्तता करावी. तात्काळ जकात सुरू करणें बाबत प्रक्रिया पार पाडावी.ठराव बहुमताने मंजूर. नियमानुसार कार्यवाही करावी. सुचक : मा.श्री.दिपक सुळ.अनुमोदक : मा.श्री.अभय आगरकर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर

प्रस्ताव क्रमांक : ( १ ब )  दि.१६-७- २००५

प्रस्तावाचा विषय - मा.शासनाचे जकात कर लागू करणे बाबतचे दि.३१मार्च २००५ चे पत्रानूसार जकात कर लागू करणेबाबत विचारविनिमय करणे जकात लागू करावयाची झाल्यास जकात वसुलीसाठीच्या प्रक्रियेबाबत धोरण ठरविणे. तसेच जकात नियमाच्या मसुद्यास मान्यता देणेबाबतचा ऑफीस रिपोर्ट.

-**-

प्रस्तावाचा मजकूर : मे.शासनाने दिनांक १/५/९९ पासुन तत्कालीन नगरपरिषदेमार्फत वसुल करण्यात येत असलेला जकात कर बंद केला.त्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडील अधिसुचना क्रमांक जीईएन १०२०००/१९० / प्र.क्र.- ९ नवि -२४ दिनांक ३० जुन २००३ अन्वये अहमदनगर शहर महानगरपालिका अस्तित्वात आली.

त्यानंतर मा.उपसचिव,महाराष्ट्र शासन यांनी शासन निर्णय क्रमांक २५०३/१५९४ / प्र.क्र.५९/०४ नवि - २६ दिनांक २० एप्रील २००४ व १ जुन २००४ अन्वये कळविले आहे की, " अहमदनगर महानगरपालिका अस्तित्वात आलेली आहे.महानगरपालिकेचे महानगरपालिकेचे संपुर्ण क्षेत्र " अ " वर्ग नगरपालिका गृहीत धरुन जी अनुदाने अनुज्ञेय होतात ती अनुदाने अहमदनगर महानगरपालिकेस दिनांक ३० जुन २००३ पासुन दोन वर्षाचे कालावधीसाठी अनुज्ञेय होतील.

मे शासनाचे वरील निर्णयानुसार महानगरपालिकेस जकातीपोटी मिळणारे अनुदान १ जुलै २००५ पासुन बंद होणार आहे.यास्तव मुंबई प्रातिंक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२७ (२) अ नुसार अहमदनगर शहर महानगरपालिका हद्यीत जकात कराची अंमलबजावणी सुरु करणे आवश्यक आहे.

अहमदनगर शहर महानगरपालिका क्षेत्रात प्रत्यक्षात महानगरपालिका कर्मचा-यामार्फत जकात वसुल करण्यापेक्षा मे.शासन आदेश क्रमांक एम एम ए १०९४ / प्र.क्र.३/९४ / नवि - ३२ दिनांक २८ फेब्रुवारी १९९४ नुसार जकात वसुलीकामी जकात अभिकर्ता नेमणे उचीत होईल.

मे शासनाचे उक्त आदेशानुसार भुतपुर्व नगरपरिषदेने सन १९९९-२००० या वर्षाकरीता जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी मे.शासनाने ठरवुन दिलेल्या नियमावली नुसार किमान देकार रक्कम रुपये १५ कोट ५० लाख निश्चित करुन निविदा मागविल्या होत्या व त्याप्रमाणे विहीत मुदतीत ४ निविदा प्राप्त झाल्या. सदर चार निविदापैकी मे.बेलेश्वर एटंरप्रायजेस ,अहमदनगर यांची रुपये १६,१६,१६,०१६/- ची निविदा सर्वात जास्त रकमेची मंजुर करण्यात आली.तथापी मे.बेलेश्वर एंटरप्रायजेस ,अहमदनगर यांनी विहीत मुदतीत बँन्क गॅरंटीची रक्कम न भरल्यामुळे त्यांची सदर निविदा रद्य करण्यात आली. व त्याचवेळी महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव यांनी त्यांचे पत्र क्रमांक जीईएन - १०९९ प्र.क्र.७०/९९ नवि - १४ दिनांक २६ मार्च १९९९ अन्वये जकात वसुलीकामी जकात अभिकर्ता न नेमता कर्मचा-याकडून जकात वसुलीचे काम सुरु करावे.नगरपालिकेतील जकात कर रद्य करण्यात येणार असल्याचे शासनाचे विचाराधीन आहे.व त्याप्रमाणे १/५/९९ पासुन जकात कर रद्य करण्यात आला.

त्यानंतर अहमदनगर शहर महानगरपालिका अस्तित्वात आली व मे शासनाचे निर्णयानुसार १ जुलै २००५ पासुन जकात पोटी मिळणारे अनुदान बंद होणार असल्याने दिनांक १ जुलै २००५ पासुन जकात सुरु करुन जकात वसुलीकामी मे.शासनाचे २८ फेब्रुवारी १९९४ चे आदेशानुसार जकात वसुलीकामी जकात अभिकर्ता नेमणुक करणे उचीत होईल.

मे.शासनाचे वरील आदेशानुसार जकात वसुलीचे काम अभिकरण पध्दतीने देतांना पहिल्या वर्षासाठी किमान देकार रक्कम ( मिनिमम ऑफर अमाऊंट ) ची गणना करण्यासाठी त्यांचे तीन वित्तीय वर्षापैकी ज्या वर्षाचे जकातीपासून जास्त उत्पन्न मिळाले असेल ती रक्कम २०% ने वाढवावी व त्यामध्ये जकात वसुलीसाठी झालेल्या आस्थापना खर्चाचे ५० % रक्कम मिळवावी अशा बेरजेनंतर जी रक्कम येईल ती रक्कम किमान देकार रक्कम म्हणून निश्चित करण्यात यावी.

मे.महाराष्ट्र शासनाने जकात कर बंद केल्यापासुन महानगरपालिकेस मे.शासनाकडून जकातीपोटी पुढील प्रमाणे अनुदान प्राप्त झाली आहे.

| अ.न. | वर्ष | अनुदानाची रक्कम |
|---|---|---|
| १ | १९९९-२००० | १२,११,२२,०००/- |
| २ | २०००-२००१ | १३,५४,५९,०००/- |
| ३ | २००१-२००२ | १४,४५,७८,०००/- |
| ४ | २००२-२००३ | १८,३२,७९,०००/- |
| ५ | २००३-२००४ | १७,१०,६०,०००/- |
| ६ | २००४-२००५ (माहे नोव्हे.अखेर ९ महीनेत प्राप्त झाले ) | १३,६४,४०,०००/- |
| | मासिक | १,५२,७३,१२५X१२= १८,३२,७७,५००/- |

मे शासनाचे उक्त निर्णयानुसार १ जुलै २००५ पासुन ३१ मार्च २००६ अखेर ९ महीन्याचे कालावधीसाठी जकात अभिकर्ता नेमणूक करण्यासाठी पुढीलप्रमाणे किमान देकार ( मिनिमम ऑफर अमांऊंट ) निश्चित करावी लागेल.

किमान देकार रक्कम -

| अ.क्र | तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | गेल्या ३ वर्षापैकी गतवर्षात (२००२-२००३) मध्ये मिळालेली अनुदानाची रक्कम | १८,३२,७९,०००/- |
| २ | अधिक वरील रकमेच्या २०% वाढ | ३,६६,५५,८००/- |
| ३ | अधिक सन ०४-०५ चे आस्थापना खर्चाची ५०% रक्कम | ५०,००,०००/- |
| ४ | एकूण वार्षीक किमान देकार रक्कम (२००५-०६ ) | २२,४९,३४,८००/- |
| ५ | वजा माहे एप्रील २००५ ते जुन २००५ या | ४,५८,१९,३७५/- |

| | | |
|---|---|---|
| | महीन्यात<br>जकातीपोटी प्राप्त होणारे अनुदाना पोटी | |
| ६ | म्हणजेच १ जुलै २००५ ते ३१ मार्च २००६ या ९ महीन्याचे कालावधीसाठीची किमान देकार रक्कम | १७,९१,१५,४२५/- |

अशाप्रकारे महानगरपालिका क्षेत्रात आयात होणा-या मालावरील जकात वसुलीकामी जकात अभिकर्ता नेमणेसाठी मे.शासनाचे निर्णयानुसार दिनांक १ जुलै २००५ ते ३१ मार्च २००६ या ९ महीन्याचे कालावधीसाठी रुपये १८,००,००,०००/-
एवढी किमान देकार रकमेस ठेका देणे उचीत होईल.मे.शासन निर्देशानुसार याबाबतचा जाहिर निवेदन मसुदा एक राज्यस्तरीय ,एक जिल्हा स्तरीय व एक स्थानिक वर्तमान पत्रातून किमान इंग्रजी व मराठी या दोन भाषेमधून प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

तरी अहमदनगर शहर महानगरपालिका हद्यीत दिनांक १ जुलै २००५ ते ३१ मार्च २००६ या ९ महीन्याचे कालावधीसाठी किमान देकार रक्कम रुपये १८,००,००,०००/- ( १८ कोट ) एवढया रकमेस जकात वसुलीकामी जकात अभिकर्ता नेमणूक करणेस मंजूरी मिळावी.ही विनंती.

यावर मा.उपायुक्त (सा. ) यांचा अभिप्राय की,'' नगरसचिव यांनी सादर केलेला अहवाल स्वयंस्पष्ट आहे. अभिकर्ता नेमणुकीमुळे अपेक्षित २० % उत्पन्नवाढ मनपाला मिळणांर असुन जकात आस्थापनेवरील कर्मचारी वर्गही अन्य विभागांसाठी उपलब्ध होणांर आहे. त्यामुळे अभिकर्ता नेमुन जकात वसुली करणें उचित वाटते.आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, '' उपरोक्त प्रस्तावाचे अवलोकन केले. प्रस्तावित किमान देकार तत्कालीन न.पा.क्षेत्रातील जकात उत्पन्न आणि मनपास शासनांकडुन जकातीपोटी मिळालेले अनुदान यावर आधारित आहे. नपा / मनपाचे हद्यवाढीत जे क्षेत्र वाढले. त्या क्षेत्रातील जकात उत्पन्नाचे क्षमतेचा,साधनांचा,घटकांचा विचार होणे क्रमप्राप्त आहे. तरी अशा बाबींचा अभ्यास करुन किमान देकार बाबत फेरप्रस्ताव सादर करा.

यावर नगरसचिव यांचा फेरसादर रिपोर्ट की, '' दि.१ जुलै २००५ ते ३१ मार्च २००६ या ९ महिन्याचे कालावधीसाठी जकात वसुलीसाठी अभिकर्ता नेमणूक करावयाची झाल्यास मे.शासनाचे मार्गदर्शक तत्वानुसार किमान देकार रक्कम रुपये १८ कोटी निश्चित होते. परंतु दि.३० जुन २००३ पासून भुतपूर्व नगरपरिषदेचे महानगरपालिकेत रुपांतर होऊन जिल्हा परिषद क्षेत्रातील केडगांव, बुरुडगांव, नागापुर, फकीरवाडा, दर्गादायरा, माळीवाडा, चाहुराणा खुर्द, बुद्रुक, मोरचुदनगर, नालेगांव, बोल्हेगांव, सावेडी, भिस्तबाग या गावांचा महानगरपालिका हद्दीत समावेश झाला. त्यामुळे महानगरपालिकेची हद्दवाढ होऊन पूर्वीचे १८२९ हेक्टर क्षेत्र आता ८३२१.३४ हेक्टर झाले आहे. त्याचप्रमाणे लोकसंख्येत खालीलप्रमाणे वाढ झाली आहे.

जनगणनेनुसार लोकसंख्येचा तपशिल

| अ.नं. | लोकसंख्येचे क्षेत्र | सन १९९१ चे जनगणनेनुसार | सन २००१ चे जनगणनेनुसार |
|---|---|---|---|
| १ | सन १९९९ पुर्वी नगरपरिषद हद्दीत समाविष्ट क्षेत्र | १,८१,३३९ | २,०७,४२८ |
| २ | सन १९९९ नंतर समाविष्ट | ५३,१०२ | १,००,१८७ |

| | | | |
|---|---|---|---|
| | क्षेत्र | | |
| | एकूण | २,३४,४४१ | ३,०७,६१५ |

नगरपरिषद अस्तित्वात असताना ज्या हद्दीमध्ये जकात वसुली करण्यात येत होती. त्या हद्दीमध्ये वरील १२ गावांचा समावेश नव्हता. त्यामुळे मा.शासनाने दिनांक १-५-९९ रोजी जकात कर रद्द केल्यानंतर अहमदनगर नगरपरिषदेने मा.शासनाकडे जकात अनुदानाची मागणी करताना वरील वाढीव १२ गावाचे क्षेत्रात आवक होणा-या मालाची म्हणजेच त्यावर होणा-या जकातीची रक्कम अनुदानात धरलेली नव्हती. हद्दवाढीत नव्यानेच समाविष्ट झालेल्या जिल्हा परिषद क्षेत्रातील नागरिकांचा व्यापारी दृष्टया संबंध हा मुळ अहमदनगर हद्दीतील बाजारपेठेशीच होता. त्यामुळे हद्दवाढीचा व वाढीव ४८.३०% लोकसंख्या वाढीचा मुद्दा विचारात घेता देकार रकमेत त्या प्रमाणात वाढ करावी लागेल. सबब अशा परिस्थितीत १ जुलै २००५ ते ३१ मार्च २००६ या ९ महिन्याचे कालावधीसाठी जकात ठेक्याची रक्कम निश्चित करताना हद्दवाढ व लोकसंख्या वाढीचा मुद्दा विचारात घेऊन त्याचप्रमाणे महानगरपालिकेचे जकात दराचे मा.शासनाचे अस्तित्वात असलेले शेडयुल विचारात घेता खालीलप्रमाणे देकार रक्कम निश्चित करावी लागेल.

| अ.नं. | तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | मागील ३ वर्षातील सर्वात जास्त उत्पन्न | १८,३२,७९,०००/- |
| २ | सन २००१च्या जनगणनेनुसार ४८.३०% लोकसंख्या वाढ विचारात घेऊन अंदाजित होणारे उत्पन्न वाढ | ८,८५,२३,७५७/- |
| ३ | अधिक वरील रकमेच्या २०% वाढ | ५,४३,६०,५५१/- |
| ४ | अधिक सन ०४-०५ चे आस्थापना खर्चाची ५०% रक्कम | ५०,००,०००/- |
| ५ | एकूण वार्षिक किमान देकार रक्कम (२००५-०६) | ३३,११,०३,३०८/- |
| ६ | वजा माहे एप्रिल २००५ ते जुन २००५ या महिन्यात जकातीपोटी प्राप्त होणारे अनुदानापोटी (अ.क्र.५ ची रक्कम विचारात घेता) | ८,२७,९०,८२७/- |
| ७ | म्हणजेच १ जुलै २००५ ते ३१ मार्च २००६ या ९ महिन्याचे कालावधीसाठीची किमान देकार रक्कम | २४,८३,७२,४८१/- |

तरी अहमदनगर शहर महानगरपालिका हद्दीत दि.१ जुलै २००५ ते ३१ मार्च २००६ या ९ महिन्याचे कालावधीसाठी किमान देकार रक्कम रुपये २४,८३,७२,४८१/- एवढया रकमेस जकात वसुलीकामी जकात अभिकर्ता नेमणूक करणेस मंजुरी मिळावी, ही विनंती."

यावर प्रभारी मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, " हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त ( सा ) वरील अहवालानुसार प्रस्ताव मंजुरीसाठी मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेसाठी शिफारस आहे.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की," सहमत "

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त ( सा ) ,मा.आयुक्त साहेब,प्रभारी मुख्यलेखा परिक्षक यांचे अभिप्रायासह व नगरसचिव यांचे फेरसादर रिपोर्टसह पुढील निर्णयास्तव महानगरपालिका सभे पुढे ठेविला.

सभेपुढील चर्चा
जकात अभिकर्ता नेमण्याच्या मंजूरीबाबत चर्चा करतांना

मा.श्री दिप चव्हाण, मा.श्री.सुरेश शेळके ,मा.श्री .कैलास गिरवले,मा.श्री.अनंत जोशी यांची सुरवातीस चर्चेत भाग घेतला.त्यावर मा.श्री गिरवले यांनी सुचविले की, जकात अभिकर्ता नेमण्याबाबत जकात कर लावण्याबाबत ज्यावेळेस शासनाकडून मंजूरी येईल त्यानंतर हा विषय खास सभेपुढे घेण्यात यावा.असे सुचविले. त्यावर श्री अनंत जोशी यांनी त्यास अनुमोदन दिले.

मा.श्री मिलींद गंधे यांनी भाग घेतांना अभिकर्ता नेमण्याबाबतचा प्रस्ताव मा.शासनाकडे पाठविल्यास त्या वेळ लागणार नाही.

१. मा.श्री.आसाराम कावरे - मनपा हददीत वाहन करावर प्रवेश कर लावण्यात यावा.

२.मा.श्री.सुरेश शेळके - यांनी शहरामध्ये जकात कर वसुलीमध्ये टोळया असल्यामुळे जकात ठेका पध्दतीने चांगली वसूल होईल.

३.मा.श्री .कैलास गिरवले - एक वर्ष जकात कर प्रशासनाने वसुल करावा.व नंतर प्रशासनाने ठेकेदारी पध्दतीने ओपन टेंडर मागवून जकात कर वसुल करावा. प्रशासन जकात वसुलीसाठी सक्षम आहे. असे त्यांनी सुचविले.

४.मा.श्री दिप नारायण चव्हाण - अभिकर्ता नेमण्याची जरुरी असली तरी अमरावतीची पध्दत लक्षात घ्यावी.नगरपालिका असतांना प्रशासनअधिकारी म्हणून मुख्याधिकारी हे काम पहात होते.आता महानगरपालिका झाल्यानंतर तीन तीन सक्षम अधिकारी काम करीत आहेत.त्यामुळे प्रशासनावर अविश्वास ठेवणे योग्य नाही.जकात कराचे / दराचे नियम अस्तित्वात नसतांना अभिकर्ता नेमण्याचा विषय गैर लागू होतो.शासनाकडून मंजूरी आल्यानंतर अभिकर्ता विषय घेण्यात यावा.अन्यथा माझा विरोध नोंदवावा.

मा.श्री द.प.मेतके ,आयुक्त - अभिकर्ता नेमणे ही बाब सोयीची आहे.देकार पटला तरच ठेका दयावयाचा आहे.व नियम व दर यांना मान्यता देवूनच पुढील कार्यवाही होणार आहे.

मा.श्री.अभय आगरकर - मंजूरी येताच २ ते ३ दिवसात सभा बोलावून निर्णय घेता येवू शकतो.

ठराव - जकात नियमांना शासनाची मान्यता प्राप्त झाल्यावर कर्मचा-यांमार्फत आयुक्तांनी त्वरीत जकात वसुली सुरु करावी व अभिकर्ता नेमणुकीसाठी विषय तात्काळ खास सभेपुढे सादर करावा.ठराव बहुमताने मंजुर.नियमानुसार कार्यवाही करावी.सुचक - मा.श्री.अनंत जोशी. अनुमोदक - मा.श्री.बहिरनाथ वाकळे

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर

प्रस्ताव क्रमांक : ( २ ) दि.१६-७- २००५

---

प्रस्तावाचा विषय - अहमदनगर शहर एकात्मिक रस्ते विकास योजना राबविणेबाबत मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळ, मुंबई यांचे कडील पत्र व त्यावरील ऑफीस रिपोर्ट.

--*--

प्रस्तावाचा मजकुर - अहमदनगर शहरासाठी एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प राबविण्याचे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई यांचे मार्फत विचाराधीन आहे. सदरचा प्रकल्प राबविण्यापुर्वी ते आर्थिक दृष्ट्या वर्धनक्षम आहे किंवा कसे ? ही बाब तपासून घेणे करीता व त्यानुसार Feasibiity Study करणे करीता सोबत जोडलेल्या पत्रा नुसार शहराची माहिती मागितली आहे.

त्या नुसार पत्रात नमुद केलेले एकूण २४ मुद्यांची माहिती तयार करणेत आली आहे. सदर माहिती नुसार Feasibiity Study करणे करीता म.रा.र.वि.म.मर्या.,मुंबई मार्फत सुसाध्यता अहवाल तयार करण्यासाठी सल्लागाराची नेमणुक करावी लागेल. महा मंडळाच्या धोरणा नुसार सल्लागारावर होणाऱ्या खर्चाचे ५०% रक्कम महानगरपालिकेने सोसावी असे अपेक्षित आहे. त्या नुसार सल्लागार वर व इतर अनुसंगीन बाबीवर होणाऱ्या खर्चाची म.न.पा. ५० % रक्कम म.रा.र.वि.म.मर्या.,मुंबई यांना तात्काळ अदा करेल असे हमी पत्र म.न.पा. मार्फत मंडळास पाठविणे आवश्यक आहे. त्या बरोबर म.न.पा. एकात्मिक रस्ते विकास योजना राबविणे बाबत इच्छुक असल्या बाबतचा मा.महा सभेचा ठराव. तसेच सोबत दिलेल्या मुद्दा संबंधीची माहिती पाठविणे आवश्यक आहे. तरी सदरचा ठराव करणेबाबत व सोबत दिलेल्या मुद्या संबंधीची माहिती म.रा.र.वि.मं.मर्या.,मुंबई यांचे कडे पाठविणे बाबत सादर.

अशा बाबतच्या ऑफीस रिपोर्टवर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, अपेक्षिलेल्या २४ मुद्यांवरील माहिती दर्शक अहवाल तात्काळ पाठविणे उचित वाटते. सल्लागारावर व इतर अनुशंगीक बाबीवरील खर्चाचा भार उचलण्यासाठी महासभेचा ठराव आवश्यक आहे. त्यामुळे उक्त माहिती सोबत ठराव झाल्यानंतर पाठविण्यात येईल असे कळविणे उचीत राहिल. संदर्भीय पत्र निर्णयासाठी मा.महासभे समोर सादर करणे बाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, म.न.पा. निधीतून शहरातील महत्वाचे रस्त्यांचे विकास व शहर सुशोभिकरण करणे अडचणीचे आहे. प्रस्तावित एकात्मिक रस्ते विकास योजने कामी इच्छुक असले बद्दल कळविणेस तथा सल्लागाराच्या खर्चाबाबत सुचीत केले प्रमाणे हमीपत्र देणे कामी निर्णय होणेस हरकत नाही.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (सा.) व मा.आयुक्त साहेब, यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव महानगरपालिका सभेपुढे ठेविला.

चर्चा :

१. मा.श्री.सुळ नगरसेवक : चर्चेस सुरुवात करतांना श्री.सुळ यांनी विचारले की, ऑफिस रिपोर्टमध्ये ५० टक्के सर्व्हेक्षणाची रक्कम महानगरपालिकेने सोसावी असे लिहिलेले आहे.

मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, याबाबत जे सर्व्हेक्षण करावयाचे याबाबतचा निम्मा खर्च महानगरपालिकेने करावा अशी अपेक्षा आहे.

२. मा.श्री.सुळ, नगरसेवक : यांनी रस्ते विकास मंडळा मार्फत जी योजना मांडली आहे. त्याकरीता श्री.लखिना साहेब यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडतो असे सांगितले.

३. मा.श्री.अनंत जोशी, नगरसेवक : सर्व्हेक्षणाची जबाबदारी घेत असतांना सावेडी येथील ड्रेनेजचा प्रश्न या महामंडळामार्फत सोडवुन घेण्यांत यावा. व या योजने मध्ये पाईप लाईन व ड्रेनेज अंतर्भुत करावे असे सुचविले. याबाबत मा.आयुक्त यांनी खुलासा केला.

४. मा.श्री.अभय आगरकर नगरसेवक : यांनी सांगितले की, याबाबत पत्रव्यवहार करुन रस्ते विकास योजने मध्येच ड्रेनेज योजनेचा डाटा असेल तर दोन्ही करुन घेण्यांबाबत चर्चा करण्यांत यावी. त्यावर आयुक्त यांनी खुलासा केला की, जे रस्ते करावयाचे आहेत, त्या रस्त्यांच्या मध्ये ड्रेनेज साठी जागा सोडावी लागणार आहे.रस्ते फोडावे लागणार नाहीत.

५. मा.श्री. अभय आगरकर, नगरसेवक - यांनी सांगितले की, याबाबत अगोदर चर्चा करावी तसेच उत्पन्न वाढविण्यासाठी नागरिकांकडुन ॲडव्हान्स रक्कम घेवुन योजना व्हायबल करु शकतो काय हे पहावे.

६. मा.श्री.मिलींद गंधे नगरसेवक - मा.अनिल कुमार लखिना यांचे मी या ठिकाणी अभिनंदन करतो, महानगरपालिकेने विकासाचा ध्यास घेवुन आणि शक्ती पणाला लावुन हा कार्यक्रम राबविला पाहिजे.

यापुर्वी गिडवाणी यांनी सर्व्हेचे काम केलेले होते ते कोठे आहे. ड्रेनेज व रस्ते दोन्ही कामे सायमल टेनेसली झाली पाहिजेत.

७. मा.श्री.गिरवले कैलास नगरसेवक - शहरातील रस्ते चांगले व्हावेत, मोठे व्हावेत या अपेक्षा आहेत. तथापि पैशाचे सोंग आणता येत नाही. विनंती करतो की, महानगरपालिकेने योजना राबवावी. व तज्ञ मंडळी इंजिनिअर, मानधनावर पाहणी करण्यांसाठी पाठवावेत.

नागरिकांची एक शिष्टमंडळ, समिती नेमावी .

८. मा.महापौर :- यांनी निवेदन केले की, महानगरपालिकेंची आर्थिक परिस्थिती विचारात घेता शहर विकास व चांगले रस्ते महामंडळामार्फत करुन घेणे आवश्यक आहे. याकरिता सर्व्हेक्षणासाठी व इतर कार्यवाही साठी एक कमिटी नेमण्यांत यावी त्यामध्ये १. नगररचनाकार २. सिटी इंजिनिअर, ३. एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर, ४. व इतर म्युनिसिपल इंजिनिअर, यांची कमिटी नेमुन कार्यवाही करण्यांत येईल असे सांगितले.

--*--

ठराव : ऑफिस रिपोर्ट प्रमाणे मा.कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळ,मुंबई यांचेकडून महानगरपालिकेस शहरातील प्रमुख रस्ते तयार करण्यांच्या धोरणांस व त्यास अनुषंगुन तयार केलेल्या प्रस्तावास ही सभा तत्वत : मान्यता देत असुन या संदर्भात रस्ते करण्यांसाठी निश्चितता असावी याकरीता मा.महापौर,मा.आयुक्त,मा.उपायुक्त (कर ) मा.उपायुक्त (सामान्य) तसेच नगर अभियंता, नगर रचनाकार, व पुढील मा.सदस्य

१. मा.श्री.ज्ञानेश्वर सदाशिव खांडरे, उपमहापौर
२. मा.श्री.मनेष दशरथ साठे, सभापती,स्थायी समिती
३. मा.श्री.सुरेश छबुराव शेळके,सभागृह नेता
४. मा.श्री. नामदेव शांताराम पवार,नगरसेवक
५. मा.श्री.भानुदास एकनाथ कोतकर, नगरसेवक

यांची समिती गठित करणेंत यावी. तसेच सदरच्या रस्त्याकरीता प्लॅन एस्टीमेंट तसेच तदनुषंगिक खर्चास मान्यता देण्यांत येत आहे. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.
ठराव सर्वानुमते मंजुर.सुचक : मा.श्री. दिपक सुळ.अनुमोदक : मा.श्री. मिलिंद गंधे.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.